follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

www.rajdand.com

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

✻ RNI Regd. No. 72105/99 | ✻ वर्ष २५, अंक १९४ | सातारा, शुक्रवार, २२ मार्च, २०२४ | ✻ पाने ८ (सुप्रभात) | किंमत रू ५/-

# महायुतीत जागा वाटपाचा पेच

## तोडगा काढण्यासाठी नेते दिल्ली दरबारी, आतातरी तिढा सुटणार?

**मुंबई :** महायुतीच्या जागा वाटपाचा तिढा आता दिल्लीतच सुटणार आहे. महायुतीच्या काही जागांवर पेच कायम असल्यानं हा पेच आता दिल्लीतच सुटणार अशी चिन्ह दिसत आहेत. लवकरच महायुतीतील भाजप, शिवसेना शिंदे गट , राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट अशा तिन्ही पक्षातील प्रमुख नेत्यांची दिल्लीत आणखी एक बैठक पार पडणार आहे. भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत तिन्ही पक्षांच्या नेत्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत जागावाटपाचा तिढा सोडवण्याचा प्रयत्न तिन्ही पक्षांच्या नेत्यांचा असणार आहे.

महायुतीमधील तिन्ही पक्षांमध्ये लोकसभेच्या बहुतांश जागांवर एकमत झाले असले तरी काही जागांवरुन रस्सीखेच सुरु आहे. आता यावर तोडगा दिल्लीतच निघणार आहे. आता दिल्लीत महायुतीची बैठक होण्याची शक्यता आहे. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे नेते दिल्लीला जाणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत महायुतीच्या नेत्यांची बैठक पार पडणार असून याच बैठकीत महायुतीच्या जागावाटपाचा तिढा सोडवला जाईल, अशी माहिती मिळत आहे.

**मनसेच्या येण्यानं महायुतीचं समीकरण बदलणार?**

लोकसभेचं बिगुल वाजलं पहिल्या टप्प्यासाठी आचारसंहिताही जाहीर झाली. मात्र, असं असलं तरीदेखील अद्याप महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील जागावाटपाचा तिढा काही सुटण्याचं नाव घेत नाही. अशातच दोन दिवसांपूर्वी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी दिल्लीत अमित शाह यांची भेट घेतली. सध्या मनसे महायुतीत दाखल होणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. या भेटीत अमित शहांनी राज ठाकरेंचा दोन जागां प्रस्ताव फेटाळून एक जागा देणं शक्य असल्याचं आश्वासन दिलं. आता महायुतीसोबत जायचं की नाही? याचा संपूर्ण निर्णय राज ठाकरेंवर सोडण्यात आला आहे. जर राज ठाकरेंनी महायुतीसोबत जाण्याचं ठरवलं, तर शिंदेंना त्यांच्या वाट्याची एक जागा गमवावी लागणार असल्याचं बोललं जात आहे. जर मनसे महायुतीसोबत आली, तर दक्षिण मुंबईची जागा मनसेला देण्याचा भाजपचा मनसुबा असल्याचं बोललं जात आहे.

| कोणत्या जागांचा तिढा अजूनही कायम? | |
|---|---|
| दक्षिण मुंबई | गडचिरोली |
| उत्तर पश्चिम मुंबई | भंडारा - गोंदिया |
| उत्तर मध्य मुंबई | अमरावती |
| रत्नागिरी -सिंधुदुर्ग | परभणी |
| ठाणे | सातारा |
| धाराशिव | नाशिक |

# मविआ जागावाटपाचे घोडे अडले तरी कुठे?

## सांगलीवरून तिढा कायम, दोन-तीन दिवसांत घोषणा




मुंबई : महाविकास आघाडीच्यानेत्यांच्या गुरुवारी पार पडलेल्या बैठकीतही जागावाटपाबाबत अंतिम निर्णय होऊ शकलेला नाही. त्यामुळे आघाडीची जागावाटपाची गाडी अडलेलीच आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी झालेल्या बैठकीला पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अनिल देशमुख, काँग्रेसकडून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, तर शिवसेना ठाकरे गटाकडून संजय राऊत उपस्थित होते.

प्रकाश आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पक्ष, माकप या मित्रपक्षांशी बोलणी सुरू असून या पक्षांशी चर्चा झाल्यानंतर येत्या दोन-तीन दिवसांत जागावाटप जाहीर होईल, असे पटोले यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले. सध्या काँग्रेस उमेदवारांची जी नावे माध्यमात छापून आली आहेत, त्यात काही बदल पाहायला मिळतील. मला सांगितले तर मी लढेन, असेही पटोले यांनी स्पष्ट केले. आंबेडकरांशी चर्चाप्रकाश आंबेडकर यांनी सात जागांवर पाठिंबा देण्याबाबत काँग्रेस अध्यक्षांना पत्र लिहिले आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आंबेडकरांशी चर्चा केली आहे.शाहू छत्रपतींची गळाभेट घेत ठाकरेंनी दिला प्रचाराचा शब्द- शाहू छत्रपती यांनामहाविकास आघाडीचीउमेदवारी जाहीर झाली आहे. शिवसैनिक पूर्ण ताकदीने त्यांना विजयी केल्याशिवाय राहणार नाहीत. कारण हा महाराष्ट्राच्या तसेच मराठी अस्मितेचा प्रश्न आहे. छत्रपतींच्या प्रचाराला तर येऊच शिवाय विजयाच्या सभेलाही नक्की येणार असल्याची ग्वाही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी कोल्हापुरातील न्यू पॅलेस येथे झालेल्या चर्चेवेळी दिली.

ठाकरे यांनी गुरुवारी दुपारी शाहू छत्रपतींची गळाभेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यांच्यासोबत तेजस ठाकरे, खासदार संजय राऊत, मिलिंद नार्वेकर होते. यावेळी बैठकीत कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील व राज्यातील राजकीय परिस्थितीवर उभयतांनी चर्चा केली.घराण्यांचे घनिष्ठ संबंधकोल्हापूरला येऊन शाहू महाराज यांची भेट घेतली. तुम्हाला आणखी काही सांगण्याची आवश्यकता नाही. ठाकरे कुटुंबीय व छत्रपती शाहू महाराजांचे ऋणानुबंध माझ्या आजोबांपासूनचे आहेत. मला आनंद आहे की याही आणि पुढील पिढीत हे घनिष्ठ संबंध जपले जातील, असे ठाकरे यांनी सांगितले.

सांगलीबाबत काँग्रेस-ठाकरे गट आग्रही सांगलीच्या जागेवर अजून चर्चा पूर्ण झालेली नाही, असे सांगत त्या ठिकाणी आघाडीतील नेत्याने जाऊ नये असा आघाडी धर्म असतो. उद्धव ठाकरेंचा महाराष्ट्रभर दौरा सुरू आहे, योगायोगाने ते सांगलीला गेले असतील, ते कशासाठी गेले हा त्यांचा प्रश्न आहे, अशा शब्दांत पटोले यांनी ठाकरेंच्या सांगली दौऱ्यावर नाराजी व्यक्त केली. यावरून सांगलीचा तिढा अजून सुटला नसल्याचे स्पष्ट आहे. या जागेवर काँग्रेस आणि ठाकरे गटाचा दावा अजून कायम आहे.

# उजनीचे पाणी औज बंधाऱ्यात पोहोचले

**सोलापूर :** शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी उजनी धरणातून भीमा नदीत सोडलेले पाणी अखेर औज बंधाऱ्यात पोहोचले. औज बंधारा शुक्रवारी सकाळपर्यंत भरून घेण्यात येईल. बंधारा भरल्यानंतर शहराची दोन महिन्याची पाण्याची चिंता दूर होईल, असे पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख व्यंकटेश चौबे यांनी सांगितले. सोलापूर शहराला उजनी ते सोलापूर जलवाहिनी, औज बंधारा, हिप्परगा तलावातून पाणी पुरवठा होतो. औज बंधारा १५ दिवसांपूर्वी कोरडा पडला.

त्यामुळे उजनी धरणातून पाणी सोडण्यात आले. १२ मार्च रोजी सोडलेले पाणी दहा दिवसानंतर औज बंधाऱ्यात आले. गुरुवारी सायंकाळी सहा वाजता बंधारा २५ टक्के भरला होता. बंधारा



भरल्यानंतर पाणी टाकळी इनटेक वेलमध्ये घेण्यात येईल.

औज बंधाऱ्यातील पाणी मे महिन्यापर्यंत पुरेल असा अंदाज आहे. जून महिन्यात पुन्हा उजनी धरणातून पाणी घेण्यात येईल. तूर्तास दोन महिने शहराला पाणी पुरवठ्याची चिंता नाही, असेही चौबे यांनी सांगितले.

# सुटीच्या दिवशीही होणार मालमत्ता कराची वसुली

**मुंबई:** मालमत्ता कराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी पालिकेने जोरदार मोहीम उघडली असून साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुटीच्या दिवशीही महानगरपालिकेच्या सर्व २४ प्रशासकीय विभागांमध्ये मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. करसंकलन खात्याचे नागरी सुविधा केंद्र सुरूही राहणार आहे. गुरुवारी टॉप टेन थकबाकीदारांची आणखी एक यादी जाहीर करण्यात आली. ३१ मार्च २०२४ हा आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस असल्यामुळे त्यापूर्वी आपल्या मालमत्तेसंबंधीचे कर भरण्यासाठी नागरिकही मोठ्या प्रमाणात संबंधित प्रशासकीय विभागांमध्ये येत आहेत.

मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये २३ आणि २४ मार्च रोजी साप्ताहिक सुटी आहे. तर, २५ मार्च रोजी धुलिवंदन आणि २९ मार्च रोजी गुड फ्रायडेनिमित्त सार्वजनिक सुटी आहे. त्यावेळी, मालमत्ता करभरणा करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना या कालावधीत कर भरताना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि निर्धारित वेळेत त्यांचा करभरणा व्हावा, यासाठी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील साप्ताहिक आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशीही करभरणा केंद्र सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२० मार्च रोजी जाहीर करण्यात आलेले ङ्गटॉप टेनफ मालमत्ता करधारक १) न्यू लूक कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि (एफ उत्तर विभाग)-१४ कोटी ४८ लाख ८९ हजार २४१ रुपये २) श्री.साई ग्रुप ऑफ कंपनीज (के पश्चिम विभाग) - १४ कोटी ०७ लाख ९४ हजार ९८३ रुपये ३) कल्पतरू रिटेल व्हेंचर्स प्रा. लि. (एच पूर्व विभाग)- १० कोटी ७० लाख ७२ हजार १६२ रुपये ४) एव्हीएएलपी (आर मध्य विभाग)- १० कोटी ३८ लाख ७१ हजार ६६८ रुपये ५) न्यू लूक कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि (एफ उत्तर विभाग) - ०८ कोटी ९२ लाख ४४ हजार ६३१ रुपये ६) पीआरएल अगस्त्य प्रा. लि. (एल विभाग)- ०७ कोटी ४२ लाख ९५ हजार ८९४ रुपये ७) चंपकलाल के वर्धन आणि कंपनी- (जी उत्तर विभाग)- ०४ कोटी ९४ लाख ९१ हजार ०७० रुपये ८) केबल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया- (आर मध्य विभाग) ०३ कोटी ५४ लाख ७० हजार २५३ रुपये ९) द टिंबर मार्केट (ई विभाग)- ०१ कोटी ५४ लाख १० हजार ४३८ रुपये १०) सुप्रीम सुखधाम (एच पश्चिम विभाग)- ०१ कोटी २२ लाख २४ हजार ३५२ रुपये.

# मतदारांसाठी लागणार २००० लिटर शाई

## प्रत्येक मतदान केंद्रावर असतील १० मिलीच्या दोन बाटल्या

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीला सुरुवात झाली आहे. सर्वत्र आता प्रचार-प्रसाराला वेग येईल. जसजसे मतदानाचे टप्पे पुढे सरकत जातील तसतसा प्रचार शिगेला पोहोचेल. रंगत वाढत जाईल. विविध रंगांच्या झेंड्यांच्या गर्दीत बोटावर लावलेली शाई अधिक उठून दिसेल. तीच मतदाराची शक्ती. पाच वर्षांतून एकदा वापरता येणारी. या शाईला अनन्यसाधारण महत्त्व असून, राज्यभरात तब्बल दोन हजार लिटर शाई लागणार आहे.

निवडणुकीत मतदान केले की मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाई लावली जाते. तुम्ही मतदानाचा हक्क बजावला आहे, हे दर्शवणारी ती शाई. या शाईची निर्मिती कर्नाटकातील एका कंपनीकडून केली जाते. राज्यभरातील ४८ लोकसभा मतदारसंघांसाठी ९७ हजार ३२५ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली असून, या मतदारसंघांमध्ये ही शाई उपलब्ध राहणार आहे. निवडणूक अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेत ही माहिती नमूद असून आयोगात सूत्रांनी ही माहिती ङ्गलोकमतफला दिली.

राज्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने सध्याच्या एकूण मतदान केंद्रांव्यतिरिक्त आणखी ७८० मतदार केंद्रे वाढवून द्यावीत अशी मागणी केली आहे. त्यावर लवकरच निर्णय होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

**नवमतदारांमध्ये उत्सुकता**

आपल्या बोटावर लागलेल्या शाईचा फोटो मतदारांकडून समाजमाध्यमांवर प्रसारित केला जातो. त्यातही नवमतदार याबाबत अधिक उत्सुक असतात.

वलयांकित व्यक्तीही मतदान केल्याचे दर्शविण्यासाठी समाजमाध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करत असतात. ही शाई इंडेलिबल इंक म्हणून प्रसिद्ध आहे.

सुरुवातीला जांभळी वाटणारी शाई बोटाला लावल्यानंतर काळी पडते.

एकदा ही शाई बोटावर लावली की काही सेकंदातच ती तत्काळ सुकते. त्याशिवाय ही शाई कुठल्याही रसायने, साबणाने पुसली जात नाही.

**प्रमाण कसे?**

प्रत्येक मतदान केंद्रावर १० मिलीची एक अशा दोन शाईच्या बाटल्या ठेवलेल्या असतात. मतदानाची प्रक्रिया पार पडली की ती बोटाला लावली जाते. राज्यातील मतदान केंद्रांच्या संख्येचा विचार केल्यास राज्यभरात सातही टप्प्यांसाठी १ हजार ९४६ लिटर शाईची गरज भासणार आहे. त्याशिवाय राज्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने काही वाढीव मतदारसंघांची मागणी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली आहे. तो आकडा ग्राह्य धरून जवळपास २००० लिटर शाई या निवडणुकीत राज्यात मतदारांच्या बोटाला लागणार आहे.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंच्या कारला अपघात, साताऱ्यात वाईजवळ कंटेनरला दिली धडक

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या कारला सातारा परिसरात अपघात झाला. साताऱ्यात वाई जवळ हा अपघात घडला. रामदास आठवले यांच्या वाहनाला कंटेनरने धडक दिल्याची माहिती मिळाली आहे. रामदास आठवले वाईहून मुंबईच्या दिशेला येत होते. या दरम्यान एका कंटेनरने त्यांच्या कारला धडक दिली. या अपघातात रामदास आठवले यांच्या गाडीचे मोठे नुकसान



झाले, परंतु सुदैवाने रामदास आठवले या अपघातातून सुखरुप बचावले. त्यांना कोणत्याही प्रकारची इजा झालेली नाही. अपघातानंतर रामदास आठवले दुसऱ्या वाहनाने मुंबईच्या दिशेला रवाना झाले.

रामदास आठवले यांच्या वाहनासमोर कंटेनर जात होता. कंटेनरने अचानक ब्रेक लावल्यावर रामदास आठवलेंच्या कारने कंटेनरला धडक दिली. या अपघातात रामदास आठवले यांच्या गाडीचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने रामदास आठवले या अपघातातून सुखरुप बचावले. रामदास आठवले यांच्या वाहनाच्या अपघाताची माहिती समोर आल्यानंतर त्यांच्या समर्थक आणि कार्यकर्त्यांमध्ये एकच खळबळ उडाली होती. मात्र रामदास आठवले सुखरुप असल्याची माहिती मिळाल्यावर समर्थकांनी जल्लोष केला.

याआधी जयकुमार गोरे, विनायक मेटे या लोकप्रतिनिंधाचाही अपघात झाला होता. आमदार जयकुमार गोरे यांच्या अपघाताची घटना घडली होती. त्यांची गाडी पलटी झाली होती. त्यांच्यावर पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात उपचार झाले व ते बचावले. मात्र शिवसंग्राम संघटेनेचे सर्वेसर्वा विनायक मेटे यांचा अपघाता मृत्यू झाला होता. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर त्यांचा अपघात झाला होता. त्यात त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता.

# पुतीन यांचे सत्तेत येणे

जी गोष्ट अगोदरच माहीत असते, ती घडली, की त्यात काहीच नवलाई नसते. अनौपचारिक गोष्टीवर केवळ शिक्कामोर्तब झाले, एवढाच त्या घटनेचा अर्थ असतो. रशियात व्लादिमीर पुतीन हे पाचव्यांदा राष्ट्राध्यक्षपदी निवडून आले आहेत, त्यात काहीच आश्चर्य वाटत नाही. दोन वर्षांच्या युद्धामुळे पुतीन हे दुबळे झाले आहेत, आता ते सत्तेवर येऊ शकणार नाहीत, अशी चर्चा करणाऱ्यांना एकतर रशिया कळलाच नाही, असे म्हणावे लागते.

दोन वर्षांहून अधिक काळ युद्ध चालूनही जगात रशियाच्या अर्थव्यवस्थेचा वेग चांगला आहे. पूर्वी पैसे मोजूनही वस्तू मिळत नव्हत्या. आता तशी परिस्थिती नाही. महागाई असली, तरी वस्तू मिळतात, हेच रशियनांच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. चीन आणि रशियाच्या अध्यक्षीय निवडीत लोकशाही नसते. मुळात ही दोन्ही राष्ट्रे कम्युनिस्ट आहेत. अमेरिका, इस्त्राईल, बांगला देश आणि पाकिस्तानच्या निवडणुकीत तरी कुठे लोकशाही मूल्ये जपली जातात? ब्रिटनाच काय तो अपवाद. तिथे घटना लिखित नसली, तरी लोकशाही मूल्यांना अजूनही जपले जाते. आता जगात सर्वंच नेत्यांनी वयाची सत्तरी ओलांडली आहे. त्यामुळे रशियात पुतीन ७१ व्या वर्षी पुन्हा अध्यक्ष झाले, म्हणून नाक मुरडण्यात काही अर्थ नाही. अर्थात याचा अर्थ चीन आणि रशियातील हुकूमशाहीचे समर्थन करावे असा होत नाही. लोकशाही मार्गाने निवडून येऊन पाशवी बहुमताच्या जोरावर लोकशाही मूल्यांना कसे पायदळी तुडवले जाते, हे अनेक देशात अनुभवायला येते आहे. बांगला देश, पाकिस्तान, रशियाच्या निवडणुका निपक्षपातीपणे झाल्या नाहीत, असे म्हणणाऱ्या अमेरिकेत पराभव दिसू लागताच डोनाल्ड ट्रम्प यांनी काय केले होते, हे वेगळे सांगायला नको. त्यामुळे अन्य देशांकडे एक बोट दाखवताना जगात पोलिसीगिरी करणाऱ्या देशांनी आपल्या पायाखाली काय जळते आहे, हे अगोदर पाहायला हवे. आताच्या निवडणुकीत पुतीन यांनी ८० टक्क्यांहून अधिक मते मिळवून, ते पुन्हा तिथले राष्ट्रप्रमुख झाले. १९९१ मध्ये रशिया सोव्हिएत युनियनपासून स्वतंत्र झाल्यानंतरचा हा सवर्ात मोठा विजय आहे, आताच्या निवडीमुळे ते सोव्हिएत संघाचे माजी अध्यक्ष जोसेफ स्टॅलिन यांनाचा विक्रम मोडतील. पुतीन यांचा कार्यकाळ २०३० पर्यंत राहील. अर्थात घटनादुरुस्तीमुळे त्यांना २०३६ पर्यंत अध्यक्ष राहता येईल. यापूर्वी ते २००० ते २००४, त्यानंतर २००४ ते २००८ पर्यंत राष्ट्रपती राहिले. त्यानंतर घटनेनुसार त्यांना आपले पद सोडावे लागले. कारण सलग दोन वेळा अध्यक्षपद भूषविणाऱ्याला तिसऱ्यांदा ते पद भूषवता येत नाही. त्यानंतर मेदवेदेव यांना अध्यक्ष करून, पुतीन पंतप्रधान झाले. २०१२ मध्ये ते पुन्हा अध्यक्ष झाले. त्यानंतर २०२० मध्ये रशियाच्या संविधानात दुरुस्ती करण्यात आली. त्यानंतर ते पुन्हा देशाचे प्रमुख झाले आहेत. पुतीन यांनी २०२० देशाचे प्रमुख म्हणून चार टर्म पूर्ण केल्या होत्या. रशियातील कार्यकाळ सहा वर्षांचा असल्याने त्यांनी २०२४ च्या निवडणुकीत भाग घेतला. नव्या घटनादुरुस्तीनुसार ते २०३० मध्ये होणाऱ्या निवडणुकीतही सहभागी होऊ शकतात. या वेळी अध्यक्षपदाच्या निवडणुकीत एकूण चार उमेदवारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी दोन उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आले. त्यात मतदार यादी व इतर कागदपत्रे बरोबर नसल्याचे सांगण्यात आले. त्यापैकी एक उमेदवार पुतीनविरोधी होता, असे मानले जाते. त्यामुळे हा नैतिकदृष्ट्या सदोष निर्णय असल्याचे बोलले जात आहे; मात्र पुतिन यांना जवळपास ८८ टक्के मते मिळाली आहेत. उर्वरित तीन उमेदवारांना मिळून १२ टक्के मते मिळाली. त्यातच हे उमेदवार क्रेमलिनशी संबंधित होते. निवडणुकीची औपचारिकता पूर्ण करण्यासाठी ते रिंगणात होते. २००० मध्ये जवळपास ५४ टक्के मते मिळवणाऱ्या पुतीन यांना या वेळी ८० टक्क्यांहून अधिक मते मिळाली आहेत. चीनमध्ये उघड स्वैराचार आहे. एकच पक्षाची सत्ता आहे. रशियातही पुतीन यांनी एक अशी व्यवस्था केली आहे, ज्या अंतर्गत केवळ नाममात्र निवडणुका घेतल्या जातात. त्याचे निकाल आधीच ठरलेले आहेत. पुतीन यांची सत्ता हुकूमशाहीसारखीच आहे. सोव्हिएत महासंघाच्या विघटनाने रशियातील एक तृतीयांश राजकीय पक्ष नाहीसे झाले आहेत. यापूर्वी कम्युनिस्ट पक्षाचे सरकार प्रदीर्घ काळ सत्तेवर होते; परंतु १९९३ मध्ये नवीन घटना बनवताना एका पक्षाची राजवट काढून टाकण्यात आली होती; परंतु ती फक्त कागदावरच काढली गेली. पुतीन यांचा तेथील राजकारणावर प्रचंड पगडा आहे. त्यांच्याकडे अनेक शक्ती आहेत. काही तज्ज्ञ रशियाला ‌‌सुपर डेमोक्रॅटिकफ अध्यक्षीय राज्य म्हणून पाहतात. तथापि, रशियाचे म्हणणे आहे की ती सार्वभौम लोकशाही आहे. आता त्याचा अर्थ काय, हा चिंतनाचा विषय आहे. रशियामध्ये ज्या प्रकारची लोकशाही विकसित केली जात आहे, ती त्याच्या इतिहासानुसार आणि तेथील लोकांच्या गतिशीलतेनुसार आहे.

आता खुद्द निवडणुकांवर नजर टाकली तर तिथे विरोधक नाही आणि जे दोन-चार आहेत ते नावालाच आहेत. भारतात निवडणुकीच्या वेळी जसे वातावरण असते, तसे रशियात होत नाही. रशियात ज्या पद्धतीने निवडणुका घेतल्या जातात, त्यावरून जणू काही घडत नाही. लोक मतदानाच्या दिवशीच जाऊन मतदान करतात. या वेळी रशियाने ऑनलाइन मतदानाचीही तरतूद केली होती. अशा स्थितीत रशियाच्या निवडणुकीला मूक निवडणूकही म्हणता येईल. पुतीन पुन्हा रशियाचे राष्ट्रप्रमुख झाल्याने त्याचा जागतिक स्तरावर काय परिणाम होईल, असा प्रश्नही लोकांच्या मनात निर्माण होताना दिसत आहे. त्याचा जागतिक स्तरावर नक्कीच परिणाम होईल. गेल्या दोन वर्षांपासून रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू आहे. रशिया आणि पाश्चात्य देशांचे संबंध शीतयुद्धानंतरच्या सर्वात वाईट पातळीवर आहेत.

जवळपास सर्वच देशांशी त्याचे शत्रुत्वाचे संबंध आहेत. पुतीन यांना सर्वाधिक मते मिळण्यामागेही ते पाश्चिमात्य देशांच्या विरोधात असणे हे एक कारण आहे. त्यामुळेच लोक त्यांना पसंत करत आहेत. पुतीन स्वतःला एक मजबूत नेता म्हणून पाहत आहेत. ते पुन्हा निवडून आल्यानंतरही पाश्चात्य देशांसोबतचे वाईट संबंध सध्या तरी आहे तसेच राहतील किंवा आणखी बिघडू शकतात. कारण पुतीन नेहमी अण्वस्त्र हल्ल्याबद्दल बोलत राहतात. आताही निवडून आल्यानंतर त्यांनी तिसरे महायुद्ध फार दूर नाही, असे म्हटले आहे. रशियाचे युरोपीय आणि अमेरिकन देशांशी संबंध चांगले नाहीत. त्यामुळे अशा परिस्थितीत रशिया नेहमीच आशियातील देशांशी आपले संबंध टिकवून ठेवण्याला प्राधान्य देतो. सध्या भारत, चीन, इराण इत्यादी देशांशी रशियाचे संबंध सुधारताना दिसत आहेत. पुतीन हे नेहमीच भारताचे मित्र राहिले आहेत. पंडित नेहरूंपासून भारताचे रशियाशी संबंध चांगले आहेत. सध्या आपली आणि अमेरिकेची मैत्री जास्त असली, तरी सुरक्षा आणि व्यापराच्या बाबतीत रशिया भारताचा भागीदार आहे. जागतिक व्यासपीठावरही रशिया नेहमीच भारताचा समर्थक राहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पुतीन यांच्यातील वैयक्तिक संबंधही चांगले आहेत. युद्धाच्या काळात मोदी यांनीच पुतीन यांना सांगितले, की ही युद्धाची वेळ नाही आणि पुतीन यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. आताही दोघांमध्ये दूरध्वनीवरून संभाषण सुरूच असते; मात्र भारताचे सध्या पाश्चिमात्य देशांशी चांगले संबंध आहेत, त्यामुळे रशियासह सर्व संबंध जपावे लागणार आहेत. पुतीन अध्यक्ष झाल्यामुळे भारतात कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही. युक्रेनवरील हल्ल्यानंतर अभूतपूर्व निर्बंध लादूनही रशियाने युरोपमधील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनून अनेक अर्थतज्ज्ञांना आश्चर्यचकित केले.

अर्थव्यवस्था चांगली चालल्यामुळे पुतीन लोकप्रिय झाले आहेत कारण त्यांनी पुन्हा एकदा स्वतःला अशी व्यक्ती म्हणून सादर केले आहे, ज्याने पश्चिमेला मोठ्या हल्ल्यात आव्हान दिले आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार, रशियन अर्थव्यवस्था २.६ टक्क्यांनी वाढली आहे. ३०० अब्ज डॉलर्सची मालमत्ता गोठवल्यानंतर आणि पाश्चात्य निर्बंधांनंतर, रशियाची अर्थव्यवस्था संकुचित होईल अशी अनेकांना अपेक्षा होती; पण हे निर्बंध जगभर एकतर्फी लागू झालेले नाहीत. ते रशियाला चीन, भारत आणि ब्राझीलसारख्या देशांशी मुक्तपणे व्यापार करण्यास अनुमती देतात, तर कझाकस्तान आणि आर्मेनियासह त्याचे शेजारी पाश्चात्य निर्बंध टाळण्यास मदत करतात. रशिया वस्तूंची निर्यात करून पैसे कमवतो. रशियाचे नैसर्गिक वायू, धान्य आणि आण्विक इंधनाचे मुख्य खरेदीदार युरोपीयन देश आहेत. युरोपीय महासंघाने कोणतेही निर्बंध लादलेले नाहीत. वस्तूंच्या किमती पूर्वीच्या तुलनेत चौपट वाढल्या असल्या तरी त्या सहज उपलब्ध होत आहेत, हे लोकांना जास्त महत्त्वाचे वाटते.

## पुण्याच्या सेवेसाठी मुरलीधर मोहोळ हक्काचे खासदार असतील

### भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा विश्वास : मोहोळांना शुभेच्छा देण्यासाठी मुंडे पुण्यात



**पुणे** : पुणे हे सांस्कृतिक, शैक्षणिक शहर आहे. या शहरातील उमेदवार मुरलीधर मोहोळ हे माझे युवा मोर्चातील सहकारी आणि स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या अत्यंत जवळचे आहेत. म्हणूनच त्यांच्या भेटीसाठी मी येथे खास आली आहे. मोहोळ प्रचंड बहुमताने विजयी होतील आणि दिल्लीला जातील, असा विश्वास भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला. ‌पुण्याच्या सेवेसाठी मुरलीधर मोहोळ हक्काचे खासदार असतील असेही त्या म्हणाल्या.

पुणे लोकसभेचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या कर्वे रस्त्यावरील २४ तास खुल्या संपर्क कार्यालयाला मुंडे यांनी भेट दिली. त्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या. यावेळी पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या आमदार माधुरी मिसाळ यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पत्रकारांशी संवाद साधताना मुंडे म्हणाल्या ‌आ. मिसाळ या माझ्या मोठ्या भगिनी तर मुरलीधर मोहोळ हे माझे छोटे बंधू असून त्यांची मोठी बहीण म्हणून त्यांना शुभेच्छा देण्यासाठी पुण्यात आली आहे. त्यांना मोठा विजय प्राप्त होवो, असेही मुंडे म्हणाल्या.

पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना त्या म्हणाल्या, ‌मी लोकसभेसाठी आजवर उमेदवार नव्हते, मात्र निवडणूक लढवण्याचा मला अनुभव आहे. वयाच्या १७ व्या वर्षापासून मी प्रचार करत आहे. मला २२ वर्षांचा राजकारणाचा अनुभव आहे. ही माझी पाचवी निवडणूक आहे. पक्षाने सांगितले तर राज्यभर प्रचार करेन. परंतु, सध्या मी माझ्या निवडणुकीकडे लक्ष दिले आहे. मी माझ्या आणि मुरलीधर मोहोळ यांच्याही विजयाविषयी आश्वस्त आहेफ

स्व. गोपीनाथ मुंडेंच्या आठवणीत रमल्या पंकजा !

मोहोळ यांच्या २४ तास खुल्या कार्यालयाच्या राजकीय कारकीर्दीवर प्रकाश टाकणारी छायाचित्रे लावली असून यात दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्याही छायाचित्रांचा समावेश यात आहे. त्यातील प्रत्येक फोटोची आठवण मुंडे यांनी जाणून घेतली.

## भारतीय जनविकास आघाडी राज्यातील सर्व लोकसभा जागा लढवणार : हेमंत पाटील



**राजदंड न्यूज नेटवर्क**

इंडिया अगेंस्ट करपशन या संघटनेच्या पुढाकाराने देशातील नोंदणीकृत ५० राजकीय पक्षांनी एकत्र येऊन भारतीय जनविकास आघाडी स्थापन केली आहे. ही आघाडी महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्व ४८ जागा लढवणार असून आज ३२ उमेदवारांची घोषणा करण्यात आली. तसेच मनोज जरांगे पाटील यांना लोकसभा निवडणुकीत उतरायचे असेल तर आम्ही उमेदवारी देणार असल्याचेही आघाडीचे नेते हेमंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भारतीय जनविकास आघाडीच्या वतीने गुरुवारी पुण्यात म महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदारसंघातील म भारतीय जनविकास आघाडी मचे पुरस्कृत संभाव्य उमेदवारांची कार्यशाळा आयजित करण्यात आली होती, त्या नंतर पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आघाडीचे प्रमुख भाऊसाहेब बावने , राजेंद्र वनारसे, शिवाजीराव म्हस्के, अशोक जाधव धनगावकर, रेणुका पानगावकर, प्रा. रेखा पाटील, सतीश देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

जरांगे पाटील यांना पाठिंबा, उमेदवारी देणार तसेच छगन भुजबळ ओबीसी साठी लढण्यास तयार असतील तर त्यांनाही मदत करणार असल्याचे सांगत हेमंत पाटील म्हणाले, प्रस्थापित राजकीय पक्ष सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास पूर्णपणे अपयशी ठरले आहेत यामुळे जनतेसमोर सक्षम पर्याय म्हणून आम्ही जात आहोत. आम्ही कोणत्याही आजी - माजी आमदार, खासदार किँवा मंत्री यांना उमेदवारी देणार नाही. सामान्य जनतेचे मूलभूत प्रश्न, शेतकऱ्यांना मोफत वीज, बेरोजगारी कमी करणे आणि पायाभूत सुविधांची निर्मिती हे आमचे ध्येय आहे.

मराठा आरक्षणावर मनोज jarange आमच्या आघाडीतील सर्व घटक पक्ष हे राज्यभर पसरलेले आहेत ज्यांची जिथे जास्त ताकद त्या पक्षाला आम्ही त्या ठिकाणी उमेदवारी दिली आहे. उर्वरित १६ उमेदवार येत्या काही दिवसात जाहीर करण्यात येतील असेही हेमंत पाटील यांनी सांगितले.

भाऊसाहेब बावने म्हणाले, राज्यात तिसरी आघाडी म्हणून भारतीय जनविकास आघाडी लोकसभा निवडणुकीत उतरणार आहे. तसेच ही आघाडी आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुद्धा लढणार आहे.

राजेंद्र वनारसे म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन या निवडणुकीत आम्ही उतरत आहोत.

## मेडिकल कॉलेजचे बांधकाम बंद पाडणाऱ्यांवर कारवाई करा - आ. शिवेंद्रसिंहराजे



**सातारा** : शासकीय मेडिकल कॉलेजचे बांधकाम कोणी बंद पाडत असेल तर त्यांच्यावर प्रशासनाने कडक कारवाई करावी अशी मागणी आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रसार माध्यमांसमोर केली.

यावेळी आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले मेडिकल कॉलेज हा जिल्ह्यातील मोठा प्रकल्प असून तो लवकरात लवकर पूर्ण झाला पाहिजे कारण या मेडिकल कॉलेजचा सातारा शाळेवरती सुद्धा मोठा परिणाम होणार असून येथील अर्थकारणाला गती मिळणार आहे परंतु काही समाजकंटक त्याचे काम बंद पाडत असून त्यांच्यावर कडक कारवाई व्हावी अशी मागणी प्रशासनाकडे केली.

तसेच सातारा जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी लक्ष घालून त्यांच्यावर कारवा करावी आणि तेथील कंत्राटदार आणि त्यांचे मजूर यांना संरक्षण द्यावे आणि जे कोणी काम बंद पाण्यासाठी आले होते त्यांच्यावरती कारवाई करण्याची भूमिका यावेळी पोलिसांनी घेतली पाहिजे आप हा प्रकल्प कोणा एकट्याचा नसून संपूर्ण जिल्ह्याचा आहे आणि तो वेळेत पूर्ण झाला पाहिजे आज या ठिकाणी चांगले शिक्षण सुरू असून एमबीबीएसच्या बॅचेस येथून बाहेर पडणार आहेत हे काम का बंद पडले याची माहिती प्रशासन घ्यावी आणि बंद पडलेले काम सुरू झाले पाहिजे.

तसेच तेथील व्हिडिओ फुटेज द्वारे तपास करून संबंधितांवर खंडणीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी देखील आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रशासनाकडे केली.

## संच मान्यतेचे नवे धोरण रद्द करा; शिक्षक संघाचे शिक्षण उपसंचालकांना साकडे

**सांगली** : शासनाने नुकताच संच मान्यतेसाठी आवश्यक पटसंख्येच्या बाबत जाचक अटींचा शासन आदेश नुकताच प्रसिद्ध केलेला असून त्यानुसार द्वि शिक्षकी शाळांना किमान ६० पटाची अट घातलेली आहे. तसेच २० पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये प्रत्येकी एक सेवानिवृत्त शिक्षक नेमला जाईल त्यापेक्षा पटसंख्या कमी असलेल्या शाळांमध्ये फक्त एकच सेवानिवृत्त शिक्षक कार्यरत असेल, तसेच सहावी ते आठवीच्या वर्गांसाठी सुद्धा पटसंख्येच्या जाचक अटी घातलेल्या असून त्या एकूणच शिक्षण विरोधी असून त्यामुळे ग्रामीण भागातील कमी पटाच्या अनेक शाळा बंद होणार आहेत. तसेच राज्यभरातून शिक्षकांची अनेक पदे अतिरिक्त होणार आहेत. सदर शासन आदेश गोरगरिबांच्या शिक्षणाच्या हक्कावर गदा आणणारा आहे. त्यामुळे सदर शासन आदेश रद्द करा. त्याबाबत शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपण



चर्चा करा अशी मागणी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने कोल्हापूर विभागाचे शिक्षण उपसंचालक श्री. महेश चोथे यांच्याकडे करण्यात आली.

या जुलमी शासन आदेशाबरोबरच राज्यातील सर्वच शाळांना शैक्षणिक वर्षांमध्ये असणाऱ्या सणांच्या सुट्ट्या एकसारख्या असाव्यात याही बाबत किमान कोल्हापूर शिक्षण उपसंचालकांच्या कार्यक्षेतील जिल्हा परिषदांना तसे सूचित करावे. एक नोव्हेंबर २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतु त्यानंतर नियमित झालेल्या शिक्षकांचे सदर योजनेमध्ये झालेल्या कपातीच्या रकमा त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यावर वर्ग करण्याचे प्रस्ताव जिल्हा परिषद, उपसंचालक कार्यालय व शिक्षण संचालक कार्यालय याच दरम्यान प्रलंबित आहेत तरी त्यावरही कार्यवाही व्हावी अशा प्रकारच्या मागण्या यावेळी करण्यात आल्या.

यावेळी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष विनायक शिंदे, जिल्हा सरचिटणीस अविनाश गुरव, शिक्षक बँकेचे संचालक शामगोंडा पाटील, कोल्हापूर शिक्षक संघाचे अध्यक्ष रवीकुमार पाटील, सुधाकर पाटील, महादेव हेगडे, सलीम मुल्ला, आसिफ मुजावर, राजेश निकम, तानाजी कोडग, आनंद उतळे यांच्यासह शिक्षक संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## बेपत्ता झालेल्या महिला, मुलींचा शोध तत्काळ घ्या

**सातारा** : गेल्या काही दिवसांपासून सातारा जिल्ह्यामध्ये मुली किंवा महिला बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झालेली पहायला मिळत आहे. वृत्तपत्रांमध्ये दररोज मुली अथवा महिला बेपत्ता झाल्याच्या बातम्या येत असतात. मिळालेल्या महितीनुसार आज अखेर आपल्या सातारा जिल्ह्यामधून सुमारे १४०० मुली, महिला बेपत्ता झाल्या असल्याचे समजत आहे. ही बाब अतिशय गंभीर आणि चिंताजनक आहे. बेपत्ता महिला, मुलींच्या सुरक्षिततेसाठी त्यांचा तत्काळ शोध घ्यावा, असे आवाहन आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पोलीस अधीक्षक समीर शेख यांना केले आहे. यासंदर्भात आ. शिवेंद्रसिंहराजेंनी पोलीस अधीक्षक शेख यांना निवेदन दिले आहे. मुली, महिला बेपत्ता होणे यामुळे संबंधितांचे आई- वडील, कुटुंब, नातेवाईक यांच्यासह समाजमानवर त्याचे विपरीत परिणाम होत असतात. यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून महिलांच्या सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलली गेली पाहिजेत. काही दिवसांपूर्वी किल्ले अजिंक्यतारा परिसरात एका मुलीचा मृतदेह सडलेल्या अवस्थेत मिळून आला होता. सदर मुलगी सुध्दा २ महिन्यांपासून बेपत्ता होती, अशी माहिती वृत्तपत्रांमध्ये छापून आली होती. दोन महिने बेपत्ता असलेल्या मुलीचा मृतदेह सापडतो पण, तिचा शोध लागत नाही ही बाब गंभीर आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# आदर्श आचार संहितेचे उल्लंघन होऊ नये ह्यासाठी म्हसवड मुख्याधिकारी यांची बदली करावी : प्रा. कविता म्हेत्रे

**सातारा :** लोकसभा निवडणुकीची आदर्श आचार संहिता लागू झाली आहे.निवडणूक आयोगाने जारी केलेल्या नियमानुसार तीन वर्षां पेक्षा जास्त एकाच ठिकाणी कार्यकाल पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची बदली होणे बंधनकारक आहे.शिवाय निवडणूक प्रकियेवर प्रभाव पडू नये म्हणून अधिकारी होम डिस्ट्रिक्ट आणि त्याच निवडणूक मतदारसंघातला असू नये या संविधानिक तत्वानुसार म्हसवड नगरपरिषद मुख्याधिकारी यांची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी प्रा.कविता म्हेत्रे अध्यक्ष राष्ट्रवादी महिला काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी सातारा यांचेकडे केली.



म्हसवड नगरपरिषद ,फ्कफ वर्ग नगरपरिषद आहे. नगरपरिषदेचे विद्यमान मुख्याधिकारी ८ जुलै २०२० रोजी म्हसवड नगरपालिकेत वर्ग -२ चे अधिकारी म्हणून हजर झाले होते. त्यांचा तीन वर्षाचा कार्यकाल ७ जुलै २०२० रोजी पुर्ण झाला आहे. त्याच दरम्यान त्यांची बदली वर्ग-१ चे अधिकारी म्हणून उपायुक्त भिवंडी निजामपूर महानगरपालिका येथे झाली. ते तिथे हजर होऊन वर्ग -१ च्या पदाचा दोन महिने पगार त्यांनी घेतला. त्या दरम्यान म्हसवड नगरपालिकेत कुणाची ही नियुक्ती होऊ दिली नाही.हे संशयास्पद आहे.त्यांनतर लगेच दोन महिन्यांत २६ ऑक्टोबर २०२३ रोजी परत ते वर्ग -१ च्या पदावरून वर्ग-२ च्या पदावर म्हसवड नगरपरिषद ह्या पदावर बदली करून आले.महाराष्ट्रात बढती झालेले वर्ग-१ पदावर काम करणारे अधिकारी जाणीवपूर्वक वर्ग -२ च्या पदावर बदली करून पूर्वीच्या ठिकाणी येतात हे महाराष्ट्रातील पहिलेच उदाहरण आहे.जो अधिकारी वर्ग-१ पदावरुन वर्ग-२ च्या पदावर काम करण्यासाठी येतो किंवा आणला जातो. तो अधिकारी निवडणूक प्रक्रियेत निःपक्षपणे व तटस्थ भूमिका घेऊ शकत नाही.शिवाय सदरच्या मुख्याधिकारी यांचे सातारा होम डिस्ट्रिक्ट आहे. त्यांचे गाव लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघात येत आहे. यामुळे म्हसवड नगरपरिषद मुख्याधिकारी यांचा निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव पडून संविधानाचे तत्व बाधित होत आहे व आदर्श आचारसंहितेचा भंग होत आहे. लोकसभा विधानसभा नगरपरिषद निवडणुका निःपक्षपातीपणे होण्यासाठी म्हसवड मुख्याधिकारी यांची तात्काळ बदली करण्यात यावी. केंद्रीय मुख्य निवडणूक अधिकारी दिल्ली,राज्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र, मा.प्रधान सचिव नगरविकास मंत्रालय मुंबई,आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालक पुणे इ.संबंधित कार्यालयाला सदर अधिकाऱ्याच्या बदलीची मागणी केली आहे.

# एकाच दिवशी तिन नागरिकांवर हल्ले : प्रशासनाची भूमिका अस्पष्ट

**हातकणंगले :** हातकणंगले नगरीत भटक्या कुत्र्यांचा उन्माद सुरूच असून ठोस कारवाई चा अभाव स्पष्ट होत आहे. आज एकाच दिवसात वेगवेगळ्या ठिकाणी कुत्र्यांच्या समूहाणे ३ नागरिकांवर हल्ला केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे प्रमाण वाढत आहे. नगरपंचायत जवळच राहणाऱ्या श्रीमती शांताबाई गणपती घारगे या ८२ वर्षीय वृद्ध महिलेवर घराजवळच भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या. सदर महिलेच्या घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असून या वयोवृद्ध महिलेला ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. त्यांच्या परिवाराला येथून पुढील ५ दिवस उपचारासाठी धावपळ करावी लागणार आहे. तसेच कोल्हापूर सांगली रोड वर दुचाकी ने जात असताना कुत्र्यांच्या समूहाणे समीर मुल्लानी या युवकाच्या दुचाकीचा पाठलाग करीत हल्ला चढवला त्यात ते रस्त्यावर कोसळून जखमी झालेले आहेत. तसेच शहरातील मुख्य रस्त्याकडेला शाळेतून येत



असताना विद्यार्थिनीचा पाठलाग कुत्र्यांच्या समूहाणे केला. सजग नागरिकांनी तातडीने धाव घेऊन तिचा बचाव केल्याने होणारी दुर्घटना टळली.

रोज अश्या घटना घडत असून प्रशासनाकडून ठोस भूमिका घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होत आहे. याविषयी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन देऊन सूचना ही देण्यात आल्या होत्या. परंतु आजवर यावर कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आली नाही.

# केर फळबाग आगीत ५१ लाखांचे नुकसान

## आंबा, काजू, आवळा, चिंच बागा आगीत भस्मसात

**पाटण :** पाटण तालुक्यातील केर या गावात अज्ञातांकडून आग लावल्याने जगजीतसिंह उर्फ बाळासाहेब बाळसिंगराव पाटणकर यांचे शेतीसह परिसरातील शेतकऱ्यांच्या फळबागांचे सुमारे ५० लाख ७३ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे . या आगीत आंबा , काजू , आवळा , चिंच आदी फळझाडांसह पाईपलाईन व गवताच्या गंजीचे पूर्णपणे नुकसान झाले आहे .

याबाबत अधिक माहिती अशी केर गावचे माजी सरपंच जगजीतसिंह उर्फ बाळासाहेब पाटणकर यांच्या मालकीची फळबाग असलेल्या शेतातील



आंबा ५० झाडं , काजू ४५० , आवळा २७० , चिंच ११० अशा वृक्षांसह पाईपलाईन असे मिळून साडेसहा एकरातील ३३ लाख ८० हजार रुपयांचे नुकसान झाले . याशिवाय शेजारच्या युवराज बाजीराव पाटणकर , दिलीप बाजीराव पाटणकर , सतीश बाजीराव पाटणकर , नितीन बाजीराव पाटणकर यांच्या शेतातील काजू ३७५ झाडं ,आंबा ५० असे वृक्षांचे सुमारे १६ लाख ५० हजार रुपये तर चंद्रकांत ज्ञानू यादव , रामचंद्र भगवान यादव , अविनाश गणपती गुजर , मधुकर गणपती गुजर यांच्या गवताच्या गंजीचे ४३ हजार ८०० रुपये असे या सर्व शेतकऱ्यांचे एकूण ५० लाख ७३ हजार रुपयांचे नुकसान झाले .

या आगीत आंबा , काजू , चिंच , आवळा आदी फळझाडे भस्मसात झाली आहेत . या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला . आगीनंतर घटनास्थळी पाटणचे पोलीस निरीक्षक अविनाश कवठेकर , तलाठी शिंदे , कृषी सहाय्यक लोखंडे , ग्रामसेवक राठोड आदींनी भेट देऊन संबंधित नुकसानीचा पंचनामा केला

# कोल्हापूरात उद्धव ठाकरे शाहू महाराजांची गळा भेट

**कोल्हापूर :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर, सांगली जिल्हा दौऱ्यावर असलेल्या शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोल्हापुरात श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांची भेट घेतली. दुपारी साडेतीन वाजता उद्धव ठाकरे यांचे नवीन राजवाड्यावर आगमन झाले. यावेळी ठाकरे व शाहू महाराजांची गळा भेट झाली.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीकडून श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांचे उमेदवारी निश्चित केली आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वच नेत्यांनी कंबर कसली आहे. शाहू महाराजांच्या उमेदवारीला बळ देण्यासाठी माजी मुख्यमंत्री



ठाकरे यांनी त्यांची आज भेट घेतली. या भेटीमध्ये निवडणुकी संदर्भात चर्चा झाल्याचे वृत्त आहे. यावेळी खासदार संजय राऊत, तेजस ठाकरे आमदार वैभव नाईक, युवराज मालोजीराजे छत्रपती, ठाकरे गटाचे शिवसेना उपनेते संजय पवार, माजी आमदार डॉ. सुजित मिणचेंकर आदी उपस्थित होते.

ठाकरे आणि शाहू महाराजांच्या भेटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला होता. यावेळी उद्धव ठाकरे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शाहू महाराजांचा विजय असो ,अशा घोषणा देऊन संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांची न्यू पॅलेस वर दोघात अर्धा तास चर्चा झाली. खासदार संजय राऊत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# गोकुळचे महालक्ष्मी कोहिनूर डायमंड पशुखाद्य

**कोल्हापूर :** जिल्हा सहकारी दूध उत्पा.संघ मर्या.,कोल्हापूर (गोकुळ) च्या ६१ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून गोकुळच्या श्री महालक्ष्मी पशुखाद्य कारखाना यांच्यामार्फत जातिवंत दुधाळ गाय, म्हैशीसाठी परिपूर्ण असलेले बी.आय.एस. टाईप १ चे नवीन प्रीमिअमचे ङ्गमहालक्ष्मी कोहिनूर डायमंडफ या नवीन पशुखाद्याचा व ङ्गमहालक्ष्मी टी.एम.आर.मॅशफ या उत्पादनाचा विक्री शुभारंभ संघाचे चेअरमन अरुण डोंगळे यांच्या शुभहस्ते व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



या शुभारंभ प्रसंगी बोलताना संघाचे चेअरमन अरुण डोंगळे म्हणाले कि, गोकुळ दूध संघाने नेहमीच दूध उत्पादकांचे हित जपण्याचा प्रयत्न केला असून सकस व गुणवत्तापूर्ण पशुखाद्य देणेसाठी गोकुळ नेहमीच कटिबद्ध आहे. म्हणूनच जिल्ह्यात सुमारे ९० ते ९५ टक्के लोक गोकुळचे महालक्ष्मी पशुखाद्य वापरतात. गोकुळ सातत्याने नाविन्यपूर्ण गोष्टी करण्याची भूमिका घेत असून दूध उत्पादकांच्या फायद्याचे नवीन उपक्रम राबवत असते गोकुळच्या दूध उत्पादकांच्या मागणीनुसार जातिवंत दुधाळ गाय, म्हैशीसाठी परिपूर्ण असलेले, उत्तम आरोग्यासाठी तसेच भरघोस दूध आणि चांगल्या प्रतीच्या फॅट साठी बी.आय.एस. टाईप १ चे नवीन प्रीमिअमचे ङ्गमहालक्ष्मी कोहिनूर डायमंडफ या नवीन पशुखाद्याचे उत्पादन सुरु केले आहे.

डायमंड पशुखाद्य हे आकर्षक ५० किलो बँग मध्ये उपलब्ध आहे. जनावरांना वाळलेल्या वैरणीची कमतरता भासू नये, टी.एम.आर.वीट जनावरांना फोडून खाऊ घालताना महिला दूध उत्पादकांना अडचणी येऊ नयेत, म्हणून संघाने याचा विचार करून नवीन स्वरुपात महालक्ष्मी टी.एम.आर.मॅश हे उत्पादन २५ किलो बँग मध्ये उपलब्ध केले आहे. यामध्ये प्रथिने १० ते ११ टक्के व फॅट १.५ टक्के असून जनावरांची रवंत प्रक्रिया सुधारून दूधवाढ व गुणवत्ता वाढ होण्यास मदत होणार आहे.या बाबतची विस्तृत माहिती दुध संस्थान परिपत्रकाद्वारे कळवली असून जास्तीत जास्त दूध उत्पादकांनी आपल्या जनावरांकरिता गोकुळच्या महालक्ष्मी पशुखाद्य कारखान्यामध्ये निर्मिती केलेल्या महालक्ष्मी कोहिनूर डायमंडफ व ङ्गमहालक्ष्मी टी.एम.आर.मॅशफ या पशुखाद्याच्या उत्पादनाचा वापर करावा असे आवाहन संघाचे चेअरमन अरुण डोंगळे यांनी केले.

यावेळी गोकुळचे चेअरमन अरूण डोंगळे, जेष्ठ संचालक विश्वास पाटील, संचालक अभिजित तायशेटे, अजित नरके, शशिकांत पाटील चुयेकर, किसन चौगले, नंदकुमार ढेंगे, कर्णसिंह गायकवाड, संभाजी पाटील, प्रकाश पाटील, अमरसिंह पाटील, बाळासो खाडे, बयाजी शेळके, राजेंद्र मोरे, संचालिका श्रीमती अंजना रेडेकर, कार्यकारी संचालक योगेश गोडबोले, व्यवस्थापक पशुखाद्य डॉ.व्ही.डी.पाटील, दूध संस्था प्रतिनिधी, दूध उत्पादक, संघाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# गोवा शक्तीपीठ महामार्ग शेतकऱ्यांच्या मुळावर

**कोल्हापूर :** महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्राचे दर्शन सुलभ व्हावे, या हेतूने गोवा, नागपूर शक्तिपीठ महामार्गाचे आद्यादेश जाहीर झाला असल्याने या अधिसूचनेनुसार या मार्गाला लागणाऱ्या जमीनी घेण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामुळे लवकरच शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहण करण्याचे काम चालू करण्यात येणार आहे . मात्र या महामार्गाचा लाभ कुणाला होणार हा प्रश्न निर्माण झाला असून या मार्गावरील शेतकरी मात्र उध्वस्त होणार आहे. या मार्गाला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलनाचे अस्त्र बाहेर काढले आहे.

तीर्थक्षेत्रांना भेटी देऊ इच्छिणाऱ्या भाविकांना या महामार्गामुळे सहजतेने तीर्थक्षेत्रांना जाता येण्यासाठी हा मार्ग वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातुर, धाराशीव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यातून हा मार्ग जाणार आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) नागपूर - गोवा शक्तीपीठ महामार्गाची अधिसूचना जाहीर केली आहे. या अधिसूचनेनुसार या महामार्गास राज्य महामार्ग (विशेष )क्रमांक १० म्हणून घोषित करण्यात आला आहे.

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातून हा मार्ग कोकणातील आंबोली, कीतवडे, गेळे, वेर्ले, पारपोली, नेने, फणसवडे, उदेली, घाराप, फुकेरी, असनिये, तांबोळी,




डेगवे, बांदा गोवा, पत्रादेवी येथे येऊन संपणार आहे. नागपूर, गोवा ङ्गशक्तिपीठफ महामार्ग ८०५ किमी लांबीचा असून यासाठी अंदाजे ११ हजार हेक्टर जमीन संपादीत करावी लागण्याची शक्यता आहे. ही जमीन भूंसापदन करण्यासाठी एमएसआरडीसीसाठी मोठे आव्हान असणार आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रासहित संपूर्ण देशात महामार्गांचे जाळे तयार करण्यात आले आहे. अनेक महामार्गाची कामे सुरू आहेत. काही महामार्गांची कामे नुकतीच प्रस्तावित करण्यात आली आहेत. यामध्ये नागपूर ते गोवा शक्तीपीठ महामार्गाचा देखील समावेश केला आहे. या महामार्गाच्या कामाला अंतिम मंजूरी नुकतीच राज्य शासनाने दिली आहे. अर्थातच या महामार्गाला विशेष राज्य महामार्गाचा दर्जा मिळाला आहे. विशेष म्हणजे या महामार्गाच्या अंतिम आराखड्याला देखील मान्यता मिळाली असून लवकरच या मार्गासाठी भूमी अधिग्रहणाचे काम सुरू होणार आहे. तसेच हा मार्ग ज्या गावांमधून आणि सर्वे नंबर मधून जाणार आहे त्याची माहिती शासनाने अधिसूचनेच्या माध्यमातून सार्वजनिक केली आहे.

महामार्ग राज्यातील बारा जिल्ह्यांमधून जाणार असून राज्यातील जवळपास १९ तीर्थक्षेत्रांना या मार्गामुळे कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. हा मार्ग राज्यातील तीन शक्तीपीठ, ज्योतिर्लिंग आणि इतर तीर्थक्षेत्रांना कनेक्टिव्हिटी देणार आहे. यामुळे राज्यातील अध्यात्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे.

विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण विभागांना हा महामार्ग जोडणार आहे. तसेच जे जिल्हे समृद्धी महामार्गाला जोडले गेले नाहीत ते जिल्हे हा महामार्ग जोडणार आहे. विशेष म्हणजे या संपूर्ण मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रातील हा सर्वाधिक लांबीचा महामार्ग म्हणून ओळखला जाणार आहे.

नागपूर गोवा हा २१ तासाचा प्रवास या महामार्गामुळे दहा तासांवर येणार असा विश्वास व्यक्त होत आहे. या महामार्गासाठी मात्र राज्य रस्ते विकास महामंडळाला ११ हजार हेक्टर जागा संपादित करावी लागणार आहे. यामुळे जमिन संपादनाचे मोठे आव्हान राज्य रस्ते विकास महामंडळाकडे उभे राहणार आहे.

राज्यातील सर्वात मोठा महामार्ग ठरणाऱ्या या महामार्गास काही जिल्ह्यातून विरोध व्हायला सुरु झाला आहे. मुख्यत्वेकरून सांगली आणि कोल्हापूर भागातील शेतकऱ्यांनी याला विरोध केला आहे. या महामार्गाने सध्या कसल्या जाणाऱ्या जमिनी जाणार असून येथील शेतकरी भूमिहीन होणार आहे . त्याचप्रमाणे या महामार्गामुळे येथे पुराचा धोका निर्माण होईल असे येथील स्थानिकांचे म्हणणे आहे. हा महामार्ग होऊ नये किंवा आपल्या भागातून जाऊ नये अशा मागण्यासाठी शेतकऱ्यांकडून आंदोलनाचे हत्यार बाहेर काढण्यात आले आहे. त्यामुळे शासनास हा महामार्ग पूर्णत्वास नेण्यास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

गोवा ते नागपूर शक्तिपीठ महामार्ग निर्णय सरकारने मागे न घेतल्यास त्यांना निवडणुकीमध्ये हिसका दाखवा. पर्यावरण नाश, पाण्याचे स्त्रोत धोका, शेतजमिनीचा नाश, टोलचा भुर्दंड यामुळे शक्तिपीठ महामार्ग हा शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा निर्णय आहे,फ अशी टीका अखिल भारतीय किसान सभेन केली आहे. तसेच या विरोध त महामार्ग रोखण्याचा इशारा कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी दिला आहे. साजणी (ता. हातकणंगले) येथे शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या वतीने हातकणंगले , शिरोळ तालुक्यातील गावातील शेतकऱ्यांच्या मेळावा घेण्यात आला. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी याला विरोध केला.

बळीराजाला वामनाने षडयंत्र रचून मारले तसेच आजचे राज्यकर्ते हे शेतकरी बळीराजाला त्याची जमीन हिसकावून घेऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त करत आहेत. शासनकर्त्यांच्या विरोधात शेतकऱ्याने आंदोलनाचे रान उठवले आहे. नागपूरपासून गोव्याच्या सीमेपर्यंत जात असलेल्या शक्तिपीठ भक्तीमार्गाला विविध जिल्ह्यातून जोरदार विरोध होत असताना दिसत आहे. सांगली जिल्ह्याच्या ज्या गावातून हा महामार्ग जाणार आहे.

# वारसा स्थळांच्या यादीत समावेशाच्या प्रस्तावासाठी पन्हाळगडाची पाहणी



पन्हाळा : ऐतिहासिक वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी स्वच्छते बरोबरच पन्हाळगडाचे ऐतिहासिक महत्त्व सांगणाऱ्या इमारतींची जपणूक करण्यावर भर देण्यात येणार असलेचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सांगितले. ते पन्हाळगडाचे नाव वारसा स्थळांच्या यादीत समावेशाच्या प्रस्तावासाठी गडाची व त्यावरील ऐतिहासिक इमारतींची पाहणी करण्यासाठी पन्हाळगडावर आले होते.

वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाच्या समावेशासाठी शासनामार्फत प्रस्ताव दाखल करण्यात येणार आहे. व त्या दृष्टीने पाहणी करण्यासाठी युनेस्कोची टीम येत्या ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात गडाला भेट देणार आहे.त्या अनुशंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी शनिवारी पन्हाळा गडाला भेट दिली.यावेळी केलेल्या पाहणी नंतर ते म्हणाले,गडावर आजही भरपूर ऐतिहासिक इमारती सुस्थितीत आहेत. यामुळेच वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाचा समावेश होत आहे.त्यामुळे यासाठीच्या प्रस्तावात गडाचे वैभव,गडावरील अस्तित्वात असलेल्या ऐतिहासिक इमारती, गडावरील छत्रपतींचे वास्तव्याचा ठेवा,ऐतिहासिक व पौराणिक महत्व विषद केले जाणार आहे.त्यासाठी भारतीय पुरातत्वविभागाने गडाला पूर्वीचे वैभव देण्याची योजना आखली आहे. त्या प्रमाणे ती सर्व कामे वेगवेगळ्या टप्प्यात केली जाणार आहेत.त्यासाठी गडावर भविष्यातील या संमंधित करण्यात येणाऱ्या सर्व योजना व बदल करत असताना स्थानिक लोकांना सहभागी करून घेतले जाईल. तसेच ऐतिहासिक दृष्टीने हानिकारक ठरणारी गडावरील अनधिकृत अतिक्रमणे प्राधान्याने हटवली जातील असे सांगितले.यावेळी पन्हाळा तहसीलदार माधवी शिंदे-जाधव, नगरपालिकेचे मुख्याधिकारी चेतन माळी, सार्वजनीक बांधकामाचे अभियंता अमोल कोळी, पुरातत्त्वचे मोनो प्रजापती,अश्पाक गारदी आदींसह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व पन्हाळा नागरिक उपस्थित होते.

पन्हाळ्यातील स्थानिक रहिवाशांच्या सहभागातूनच नवीन सुधारणा होणार आहेत त्यामुळे पन्हाळगड वारसा स्थळांच्या यादीत जाण्यामुळे स्थानिकांनी कोणताही गैर समाज करून घेऊ नये.अथवा अफवांवर विश्वास ठेऊ नये.

\- अमोल येडगे, जिल्हाधिकारी कोल्हापूर

भारतातील जेसलमेर किल्ल्यावर लोक रहिवास आहे. त्याच समावेश जागतिक वारसा स्थळांच्या यादीत आहे.तेथे आज हि शहर वसलेले आहे त्याच धर्तीवर पन्हाळगडावर सुध्दा लोक रहिवास असल्याने पन्हाळ्याचा समावेश जरी जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समावेश झाला तरीही तेथील लोकांना घाबरण्याचे कारण नाही पन्हाळ्यातील रहिवास अबाधित राहणार आहे.

ईतिहास अभ्यासक डॉ. सचीन पाटील

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या निळ्या झेंड्याचा सन्मान वाढविण्याचा निर्धार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई** : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील दलित मुस्लिम ख्रिश्चन बौद्ध ओबीसी हिंदू सर्व जाती धर्मियांना एकत्र करून व्यापक रिपब्लिकन पक्ष स्थापन करून निळा झेंडा आपल्या हाती सोपवला आहे रिपब्लिकन पक्षाचा सामाजिक परिवर्तनाचा निळ्या झेंड्याचा वारसा आम्ही देशभर चालवत आहोत .गरीब बहुजन वर्गाला न्याय देण्याचे काम करत आहोत. राजकारणात आम्ही अनेक राजकीय युतीचे प्रयोग केले मात्र हाती असलेला निळा झेंडा कधी खाली पडू दिला नाही. आमचा प्राण गेला तरी बेहत्तर परंतु निळा झेंडा कधी खाली पडू देणार नाही. आगामी निवडणुकीत

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन पक्षा निळ्या झेंड्याचा सन्मान वाढवण्यासाठी काम



करण्याचा निर्धार करा असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी आज केले. महाड चवदार तळे येतील सत्याग्रहाच्या ९७ व्या वर्धापनदिनी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आयोजित जाहीर अभिवादन सभेत ना. रामदास आठवले बोलत होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष आम्ही देशभर चालवत आहोत .

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला निळा झेंडा आम्ही देशभर पोहोचवला आहे. भाजप शिवसेनेबरोबर आम्ही युती केली मात्र निळा झेंडा आम्ही कधी खाली पडू दिला नाही.निळ्या झेंड्याचा सन्मान वाढवण्यासाठी आम्ही काम करीत आहोत आणि काम करीत राहू .

माझा पक्ष गरिबांचा पक्ष आहे. गरीब कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. गरिबांचे प्रतिनिधित्व करणारा माझा पक्ष आहे. त्यामुळे महायुतीने आमच्या गरीब पक्षाला मागे ठेवू नये. माझे कार्यकर्ते गरीब असले तरी मजबूत आहेत. पँथर सारखे चपळ आहेत .रिपब्लिकन पक्ष कधी मागे राहत नाही. रिपब्लिकन कार्यकर्त्यांना आगेकूच करणे चांगले जमते. त्यामुळे महायुतीने गरीब समजून रिपब्लिकन पक्षाला मागे ठेवू नये असा इशारा ना. रामदास आठवले यांनी दिला.

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्यावर केलेली क्रांती ही सामाजिक युगप्रवर्तक क्रांती होते सामाजिक समतेचा संघर चवदार तळ्याच्या पाण्याला स्पर्श करून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केला सामाजिक क्रांतीमुळेच आज समाजात समता नांदत आहे.काही ठिकाणी दलित अत्याचार घडत आहेत मात्र समाजात परिवर्तन झालेले आहे .सवर्ण समाजातील अनेक लोक दलितांच्या मदतीसाठी पुढे येत आहेत. सर्व जाती धर्मातील लोक महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना मानत आहेत. शिवशक्ती भीमशक्ती केल्यानंतर शिवसैनिक ही जय भीम बोलू लागलेले आहेत.समाजात परिवर्तन हळूहळू होत आहे. जे लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार स्वीकारून समतेचा भावनेने दलितांना पाठिंबा देत आहेत त्यांचे आपण स्वागत केले पाहिजे.

# गगनबावडा तालुका प्रभारी अधिकाऱ्यांवर अवलंबून

## अनेक विभागात रिक्त पदांचे ग्रहण. लोकनेत्यांचे दुर्लक्ष



**गगनबावडा** : गगनबावडा तालुक्यातील अनेक विभागाला रिक्त पदांचे ग्रहण लागले असून अनेक विभागाचा कारभार प्रभारीवर चालत आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला सुविधा देताना विलंब होत असल्याचे चित्र पहावयास मिळते. त्यातच जिल्हा परिषद व पंचायत समितीचा कार्यकाल संपल्यापासून लोकनेत्यांनीही याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे .

एकीकडे प्रशासन मशासन आपल्या दारीफ उपक्रमाच्या माध्यमातून तळागाळापर्यंत सेवा -सुविधा पोहोचविण्याच्या प्रयत्नात आहे. तालुक्यातील तहसील कार्यालय ,पंचायत समिती मध्ये अनेक विभागाचे कामकाज प्रभारीवर चालत आहे. पशुसंवर्धन, शिक्षण, कृषी , बांधकाम ,रेशनिंग, संजय गांधी व अभिलेख कार्यालयातील अनेक पदे रिक्त आहेत. त्यातच दहावी, बारावी शालांत परीक्षा चालू असल्याने परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षणासाठी अनेक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. परिणामी अनेक कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे अनेक कार्यालयात स्मशान शांतता पहावयास मिळते. सर्वसामान्य जनतेला आर्थिक भुर्दंड्या बरोबरच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. गेली दोन महिने तालुक्यातील तहसीलदार पद रिक्त आहे. नायब तहसीलदार कामकाज पाहत आहेत. गटविकास अधिकारी पदाचा कार्यभार पन्हाळा गटविकास अधिकाऱ्यांच्या कडे दिला आहे. पोलीस प्रशासनामध्ये वर्षभरात पाच सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी कामकाज पाहिले आहे. या अधिकाऱ्यांच्या सातत्याने बदल्या होत आहेत. आरोग्य विभागात प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एमओ ची नेमणूका रखडलेल्या आहेत तर काही अधिकारी वेळेचं बंधन न पाळता वेळेत कार्यालयात हजर नसतात. त्यामुळे लोकप्रतिनिधी, नूतन जिल्हाधिकारी याकडे लक्ष घालून तात्काळ अधिकाऱ्यांची नेमणूक करून जनतेला सेवा पुरवणार का? याकडे सर्वसामान्य जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.

गगनबावडा तालुक्यामध्ये काम करणारे अनेक अधिकारी शिकाऊ , तर काही शिक्षा म्हणून पाठविले जातात. काही अधिकारी वेळेचे बंधन पाळत नाहीत. परिणामी याचा त्रास तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागतो. त्यामुळे असे अधिकारी आमच्याच वाट्याला का ? असा सवाल जनसामान्यातून व्यक्त केला जात आहे.

# येत्या १३ एप्रिलला रुद्राचा थरार प्रेक्षकांच्या भेटीला

**कोल्हापूर** : धमाल मस्ती असणाऱ्या रुद्रा, या मराठी चित्रपटाचा थरार प्रेक्षकांच्या भेटीला येत्या १२ एप्रिलला येत आहे.

एका क्रूरकर्मा अण्णा पाटील, नावाच्या व्यक्तीच्या कारवायांमुळे त्रस्त झालेले गाव व पुढे सरकणारे आगळे वेगळे कथानक प्रेक्षकांना थरारक अनुभूती देणार आहे, वाईटावर चांगल्याची मात, त्यातून वेळोवेळी कलाटणी देणारे कथानक त्यामुळे निर्माण होणारी स्थिती प्रेक्षकांना वेगळ्या दुनियेत घेऊन जाईल. या चित्रपटाच्या निमित्ताने प्रेक्षकांना वेगळाच थरार अनुभवायला मिळणार आहे.

माँ भवानी फिल्म या बॅनर अंतर्गत बनलेला हा चित्रपट अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या रुद्राच्या आयुष्यावर आहे. भावाच्या मृत्यूनंतर दुखावल्या गेलेल्या बहिणीने घेतलेली रुद्राची मदत व दृष्ट अण्णा पाटील चा मृत्यू होत नाही तोपर्यंत मी केस बांधणार नाही! अशी शपथ घेणारी बहीण, भक्कम असे व्यक्तिमत्व असणाऱ्या अण्णा पाटील समोर रुद्राचा निभाव लागेल का? भावाच्या मृत्यूनंतर दुखावलेली बहीण केस बांधेल? या सर्वच प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना रुद्रा चित्रपट पाहिल्यानंतरच मिळणार आहेत कित्येक दिवस असे थरारक चित्रपट मराठी सिनेसृष्टीत पाहायला मिळत नव्हते मात्र रुद्राच्या रूपाने एक वेगळीच पर्वणीच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

भन्नाट थरारक रुद्रा, या चित्रपटाची निर्मिती अशोक कामले व दिपाली सय्यद यांची आहे. तर या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा अशोक कामले व सुनील मोटवानी या दिग्गज दिग्दर्शकांनी सांभाळली आहे. चित्रपटाचे सहाय्यक निर्माते प्रमोद कवडे व प्रमोद कामले आहेत. या चित्रपटात रुद्राच्या भूमिकेत नव्या दमाचा नायक सिद्धार्थ असून, सिद्धार्थ व अपूर्वा कवडे यांची फ्रेश जोडी प्रेक्षकांच्या नक्कीच पसंतीस पडणार आहे. त्याचबरोबर सुप्रसिद्ध हिंदी चित्रपट गजनी फेम प्रदीप रावत, दिपाली सय्यद,अनुप सिंग ठाकूर, निशिगंधा वाड ढोलकीच्या तालावर फेम माधुरी पवार,जानकी पाठक, विश्वेश्वर चव्हाण, विना जगताप वैष्णवी करमरकर,अशोक कानगुडे, अशोक कामले, भूपेंद्र सिंग, दिलीप वाघ,बाळासाहेब बोरकर, संपदा भोसले,हरी कोकरे, विशाल राठोड, लक्ष्मण सालवा, संदीप कामले, निर्मल शेट्टी हे कलाकार पाहायला मिळणार आहे तर मिळणार आहेत.

या चित्रपटाचे संगीत प्रवीण कुवर ,लहू महादेव बबली यांनी लयबद्ध केले असून, आघाडीच्या गायिका वैशाली माडे, सोनाली पटेल,संचिता मोरजकर,पौलमी मजुमदार, अनन्या मुखर्जी अनुप सिंग ठाकूर अशोक कांबळे, धम्मरक्षित रणदिवे या गायकांनी आपल्या मधुर आवाजात चित्रपटाची गाणी संगीतबद्ध केली आहेत. या चित्रपटाचे डीओपी अरविंद सिंग पुवार, संजीवकुमार हिल्ली, हे असून, चित्रपटाचे एडिटर मनोज गोविंद संकला आहे हे आहेत, तर चित्रपटाची मार्केटिंग विक्रम रिक्रिएशनचे विक्रम धाकतोडे यांनी सांभाळली आहे.

# सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात मीडिया सेलचे कामकाज गतिमान

**सातारा** : सध्या लोकसभा निवडणुकीच्या कार्यक्रम जाहीर झाला असून सध्याची निवडणूक ही सर्व अर्थाने ऐतिहासिक ठरणार आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीकडे सर्वांचेच बारकाईने लक्ष लागलेले आहे. खरं म्हणजे निवडणुका येतात त्याबद्दल दुमत नाही. यंदाची निवडणूक ही बऱ्याच अर्थाने गाजणारी आहे. सातारा जिल्हा अधिकारी कार्यालयात मीडिया सेलच्या माध्यमातून कामकाज गतिमान करण्यात आलेले आहे त्याची आता चर्चा सुरू झालेली आहे.

विशेष बाब म्हणजे यापूर्वी अनेक निवडणुका झाल्या पण आता जशा पद्धतीने मीडिया बद्दल शंका उपस्थित केल्या जात आहेत. तशी शंका यापूर्वी घेतली गेलेली नाही. कारण मीडिया व प्रसार माध्यमांनी जबाबदारीने काम केले होते .अलीकडच्या काळामध्ये संपूर्ण मीडिया काही प्रमाणात सोशल मीडिया वर चेष्टेचा विषय झालेला आहे. सोशल मीडिया व युतुब च्या माध्यमातून काही दुर्लक्षित बातम्या प्रसारित करताना त्याची कोणतीही शहनिशा पाहिली जात नाही. यावर निर्बंध घालण्यासाठी आता प्रथमच चांगल्या पद्धतीने योजना आखली गेलेली आहे. यामुळे पेड न्यूज व पॅकेज घेणाऱ्या प्रवृत्तीला काही अंश प्रमाणात आळा बसेल. असे मानण्यात येत आहे. सातारा जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र डूडी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावर सध्या मीडिया सेल कामकाज सुरू झाले आहे

# डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

**शिरोली** : डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा १२ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार दिनांक २२ मार्च रोजी माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत, कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे. के.एल.ई. अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च अभिमत विद्यापीठ, बेळगावीचे कुलगुरू डॉ. नितीन गंगणे हे या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून दीक्षांत भाषण करणार आहेत.

यावेळी स्पाईन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शेखर भोजराज यांना डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस्सी.) तर क्रीडाई महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष आर. ए. (बाळ) पाटणकर यांना डॉक्टर ऑफ लेटर्स ( डी. लीट.) या पदवीने सन्मानित केले जाणार आहे. हॉटेल सयाजी येथील व्हिक्टोरीया सभागृहात सकाळी ११.00 वाजता दीक्षांत समारंभ होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. भोसले, परीक्षा नियंत्रक डॉ. अभय जोशी, रिसर्च डायरेक्टर डॉ. सी डी लोखंडे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली गायकवाड, मेडिसिन विभाग प्रमुख डॉ. राजेश ख्यालाप्पा आदी उपस्थित होते.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाची स्थापना २००५ साली झाली. विद्यापीठाने शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून यावर्षी नॅक ए प्लसफ मानांकन प्राप्त केले आहे. विद्यापीठाकडून पीएच.डी. प्राप्त केलेले बहुसंख्य विद्यार्थी देश-विदेशात संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या क्षेत्रात मोठे नाव कमावले आहे. वैद्यकीय व परिचारीका महाविद्यालयाच्या माध्यमातून कोल्हापूर परीक्षेत्रातील गरीब व गरजू रूग्णांना मोफत सेवा दिली जात आहे. भौतिक उपचार व औषध निर्माण शास्त्र शाखेच्या माध्यमातून आरोग्यसेवेत योगदान देणारे विद्यार्थी घडवले जात आहेत. आंतरशाखीय वैद्यकीय विषयात पदव्युत्तर व संशोधन अभ्यासक्रम व अल्पकालीन पॅरामेडिकल अभ्यासक्रमही सुरू असल्याचे डॉ. मुदगल यांनी यावेळी सांगितले.







कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांनी उपस्थितांचे स्वागत करून पदवीदान कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यावेळी प्रमुख पाहुणे व डॉक्टरेटने सन्मानित करण्यात येणाऱ्या मान्यवरांच्या कार्याची माहिती त्यांनी दिली.

दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. नितीन गंगणे हे के. एल. ई. अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च, अभिमत विद्यापीठ बेळगावी येथे कार्यरत आहेत. यापूर्वी महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस , सेवाग्राम येथे डीन म्हणून काम पाहिले आहे. १८० हून पब्लिकेशन्स त्यांच्या नावावर आहेत. कर्करोगावरील संशोधनासाठी त्यांना इंटरनॅशनल ग्रँड फेलोशिप मिळाली आहे.

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या नियामक मंडळाचे सदस्य, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या व्यवस्थापन आणि शैक्षणिक परिषदेचे सदस्य व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठच्या सिनेटवरही त्यांनी काम केले आहे. ते इंडियन असोसिएशन ऑफ पॅथॉलॉजिस्ट अँड मायक्रोबायोलॉजिस्टच्या महाराष्ट्र चॅप्टरचे अध्यक्ष होते.

दीक्षांत समारंभात डी. एस्सी. पदवीने सन्मानीत केले जाणारे डॉ. भोजराज हे जगविख्यात मणका रोग तज्ञ आहेत. स्पाईन फौडेशनचे संस्थापक आणि अध्यक्ष असेलेले डॉ. भोजराज हे लीलावती हॉस्पिटल, ब्रीच कॅन्डी हॉस्पिटल, गुरुनानक हॉस्पिटल येथे कॅन्सल्टंट स्पाईन सर्जन म्हणून ते कार्यरत आहेत. समाजातील गरीब लोकाना मणका उपचार करता यावेत यासाठी २०१९ मध्ये स्थापन केलेल्या स्पाईन फौडेशनच्या माध्यमातून गडचिरोली, आंबेजोगाई, औरंगाबाद, अकोला, रत्नागिरी, कोल्हापूर या ठिकाणी ते सेवा देत आहेत. आजपर्यंत त्यांनी मणक्याच्या १० हजाराहून अधिक यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत. चित्रकला आणि फोटोग्राफी यांचीही त्यांना प्रचंड आवड आहे. स्पाईन सर्जरीसाठीच्या योगदानाबद्दल अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी डॉ. भोजराज यांना सन्मानित करण्यात आले आहे.

आर. ए. बाळ पाटणकर हे क्रीडाई महाराष्ट्र आणि कोल्हापूरचे माजी अध्यक्ष असून त्यांनी बांधकाम व्यावसायिकांसाठी बनवलेला ङ्गकोड ऑफ कंडक्टफ आणि सुरु केलेला ङ्गदालनफ उपक्रम आजही नावजले जातात. कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनी तब्बल ३५ वर्षे काम करून क्रिकेटच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. या माध्यमातून अनेक नामवंत क्रिकेटपटू घडविण्यात तसेच कोल्हापूरचे नाव क्रिकेट विश्वात उंचावण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड अर्थात नॅबची शाखा कोल्हापूरात सुरु करण्यात त्यांचा पुढाकार होता. या संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून ते अंधांसाठी कार्यरत आहेत. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पहिले आहे. नागोजीराव पाटणकर हायस्कूलचे अध्यक्ष म्हणून ते शैक्षणिक क्षेत्रातही योगदान देत आहेत. मुलांना स्पर्धा परीक्षा विषय मार्गदर्शन व्हावे यासाठी सुरू करण्यात आलेल्या अरुण नरके फाउंडेशनचे स्थापनेपासून तब्बल २५ वर्षे अध्यक्ष स्थान त्यांनी भूषवले आहे. हॉटेल टूरिस्ट आणि हॉटेल अट्रीयाच्या माध्यमातून हॉस्पिटलिटी क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे.